**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, पहिला माळा, बी विंग
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
दुरध्वनी क्र.०७१२-२५५६९१६, ई-मेल: apccfnodal@mahaforest.gov.in

**ई-मेलव्दारे / स्पिडपोस्टव्दारे**

क्र.कक्ष-१७/FCA-S1/PID-३६८०३/गडचिरोली/७३१
नागपूर ४४० ००१, दिनांक २५/०६/२०२४

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
गडचिरोली

विषय :- Proposal for diversion of 4.00 ha. forest land under Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 for construction of Administrative Building of Arm Out Post at Compt. No.116, Survey No.135 in Village-Piplli Burgi, Tah.-Ettapalli, District-Gadchiroli in the State of Maharashtra.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, पत्र क्र.एफएलडी-३६२३/ प्र.क्र.१८७/फ-१०, दि.२४/०६/२०२४.

विषयांकीत प्रकरणी राज्य शासनाचे संदर्भीय पत्रान्वये उपस्थित करण्यात आलेल्या सहा मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर मुद्देनिहाय अनुपालन अहवाल विभागीय व वृस्तस्तरीय कार्यालयाच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तसेच आवश्यक माहिती व दस्तऐवजांसह तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावा. जेणेकरून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करता येईल.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

२५/६/२४

**(नरेश झुरमुरे)**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, भागरागड वनविभाग, आलापल्ली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.
प्रतिलिपी:- पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

# महाराष्ट्र शासन

E-mail: **deskf10.rfd-mh@gov.in**

क्र.एफएलडी-३६२३/प्र.क्र.१८७/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: - २४ जून, २०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर.

विषय:- वनजमिन-गडचिरोली
पोलीस मदत केंद्र (Arm Out Post) च्या प्रशासकीय इमारत व इतर बाबींकरीता मौजे पिपली बुर्गी, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील ४.०० हे. संरक्षीत वनजमीन वळतीकरणाबाबत.

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. डी-१७/एफसीए-एस१/पीआयडी-३६८०३/ गडचिरोली /३३३६, दि.०४.०३.२०२४.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

(१) प्रस्तावातील KML File चे अवलोकन केले असता, वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या काही वनक्षेत्रावर बांधकाम केल्याचे दिसून येते. सबब, सदर प्रकरणी वनभंग झाला किंवा कसे, याबाबतची माहिती सादर करावी.

(२) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचे KML File चे अवलोकन केले असता, सदर क्षेत्रावर ५० टक्के पेक्षा अधिक क्षेत्रावर झाडे दिसून येतात. सबब, सदर क्षेत्रावर प्रतिहेक्टरी ११११ रोपांची लागवड करता येईल किंवा कसे, नसल्यास पर्यायी वनीकरणासाठी अन्य अवनत वनजमिन प्रस्तावित करणे आवश्यक आहे किंवा कसे, याबाबत अभिप्राय सादर करावेत.

(३) प्रस्तावित वनक्षेत्र राष्ट्रीय उद्यान, वन्यजीव अभयारण्य यांचे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशिल क्षेत्र (ESZ) मध्ये येते किंवा कसे (प्रत्यक्ष/Deemed) याबाबत स्पष्ट अभिप्राय सादर करावे तसेच सदर अंतर दर्शवणारा नकाशा व उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र सादर करावे.

(४) जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्यामार्फत सादर करण्यात आलेल्या FRA प्रमाणपत्रावर शिक्का दिसून येत नाही. सबब, त्यानुसार प्रमाणपत्र सादर करावे.

(५) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या वनजमिनीचे अधिकार अभिलेख सादर करावेत.

(६) प्रकल्पाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक/प्रशासकिय मान्यता घेतली आहे किंवा कसे, याबाबतची माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली
उप वनसंरक्षक, भामरागड